**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

## परिपत्रक क्र. १७८/२०१८

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कळविण्यात येते की, ज्या शिक्षकांची निवड, स्थानिक निवड समितीमार्फत एका शैक्षणिक वर्षापुरतीच करण्यात आलेली आहे व अशा शिक्षकांना विद्यापीठाने स्थानिक निवड समितीच्या अहवालानुसार एकाच वर्षासाठी शिक्षक मान्यता दिलेली आहे व त्यापैकी ज्या शिक्षकांना विद्यापीठाने पदव्युत्तर शिक्षक/एम.फिल/पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक म्हणून पत्र दिलेली आहेत अशा शिक्षकांनी १ जून २०१९ पूर्वी त्यांनी ज्या महाविद्यालयातून पदव्युत्तर शिक्षक/एम.फिल/पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक मान्यता मिळविण्यासाठी अर्ज केलेले आहेत अशाच महाविद्यालयातून विद्यापीठाची कायमस्वरुपाची शिक्षक मान्यता प्राप्त असलेली पत्रे अथवा ज्या शिक्षकांची नवीन महाविद्यालयामध्ये नेमणूक झाली असेल त्या महाविद्यालयातील नेमणूकीस विद्यापीठाने कायमस्वरुपी शिक्षक मान्यता दिली असल्याची पत्रे मा. प्राचार्य यांचे सही व शिक्यासह साक्षांकित करुन शैक्षणिक विभागातील कक्षाधिकारी, अधिष्ठाता मंडळ (बी.ओ.डी) यांचेकडे सादर करणे अनिवार्य आहे. जे शिक्षक १ जून २०१९ पूर्वी विद्यापीठाची कायमस्वरुपी शिक्षक मान्यतेची पत्रे सादर करणार नाहीत अशा शिक्षकांची पदव्युत्तर शिक्षक/एम.फिल/पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक मान्यतेची पत्र रद्द समजण्यात येतील.

तथापि, ज्या संशोधक मार्गदर्शकाकडे एम.फिल/पीएच.डी. चे विद्यार्थी आहेत त्या विद्यार्थ्यांचे संशोधन पूर्ण होईपर्यंतच असे मार्गदर्शक, मार्गदर्शन करु शकतील. दि. १ जून २०१९ पर्यंत ज्या शिक्षकांना विद्यापीठाची कायमस्वरुपी शिक्षक मान्यतेची पत्रे नसतील अशा संशोधन मार्गदर्शकांना नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी करता येणार नाही.

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

गणेशखिंड, पुणे:४११००७
जा.क्र. आरआर/1045/२०१८
दि. २९ सप्टेंबर २०१८

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :—

१. मा. प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये
२. मा. संचालक, सर्व विद्यापीठ मान्यताप्राप्त परिसंस्था
३. मा. संचालक सर्व विद्यापीठ मान्यताप्राप्त संशोधन संस्था
४. उपकुलसचिव शैक्षणिक प्रवेश विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे